पुढारी

# शिवाजी विद्यापीठात विद्यार्थ्यांचा जल्लोष

## 'चांद्रयान-३' च्या लँडिंगचे थेट प्रक्षेपण

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

चांद्रयान-३ चे यशस्वी लँडिंग होताच, शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात उपस्थित विद्यार्थ्यांनी जल्लोष केला. 'भारत माता की जय' च्या घोषणांनी सारे सभागृह दणाणून सोडले. विद्यापीठाच्या वतीने चंद्राच्या पृष्ठभागावर 'चांद्रयान - ३' च्या लँडिंगचे थेट प्रक्षेपण सायंकाळी ५.३० ते ६.३० या कालावधीत एकत्रित पाहण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली होती. विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान अधिविभाग सभागृह व पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्र येथेही ही सुविधा केली होती.

या ऐतिहासिक प्रसंगी राजर्षी शाहू सभागृह येथे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. शरद बनसोडे, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. डी. के. गायकवाड, उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे, डॉ. प्रिया देशमुख, डॉ. अभिजित रेडेकर यांचेसह विद्यार्थी-विद्यार्थिनी, संशोधक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक, अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, विज्ञानप्रेमी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

2 4 AUG 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात जल्लोष

प्रतिनिधी
कोल्हापूर

भारताचे 'चांद्रयान ३' चंद्रावर उतरलेली दृश्य पाहण्यासाठी सर्व प्राध्यापक, विद्यार्थी उत्सुक होते. शिवाजी विद्यापीठातील पदार्थविज्ञानशास्त्र अधिविभाग, शाहू सभागृहात व पन्हाळा येथील आवकाश संशोधन केंद्रात मोठी एलईडी स्क्रिन लावली होती. या स्क्रिनवर सर्व प्राध्यापक, संशोधक आणि विद्यार्थ्यांनी 'चांद्रयान ३' चंद्रावर लँडींग होतानाचा क्षण पाहिला आणि 'भारतमाता की जय'च्या घोषणांनी विद्यापीठात परिसर दुमदुमला. भविष्यातील चंद्रासह इतर ग्रहावरील मोहिमा भरत यशस्वी करू शकतो, हे 'चांद्रयान ३'ने जगाला दाखवून दिले, अशा भावना प्राध्यापकांनी व्यक्त केल्या.

चांद्रयान लँडींग होताच विद्यार्थी, प्राध्यापक व अधिकाऱ्यांनी आनंद व्यक्त केला. पन्हाळा येथील आवकाश संशोधन केंद्रात 'चांद्रयान ३'चे प्रक्षेपण पाहण्यासाठी आलेल्या लोकांना डॉ. नागेश कोठवळे यांनी तर शिवाजी विद्यापीठात डॉ. राजीव व्हटकर यांनी माहिती दिली. सोशाल मिडियावर फोटो शेअर करून भारताच्या यशाचा जयजयकार केला.

राजर्षी शाहू सभागृहातील थेट प्रक्षेपण पाहण्यासाठी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. शरद बनसोडे, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. डी .के. गायकवाड, उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे, डॉ. प्रिया देशमुख, डॉ. अभिजीत रेडेकर, पदार्थविज्ञानशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. के. वाय. राजपुरे, डॉ. एम. जी. टाकळे, डॉ. आर. जी. सोनकवडे, डॉ. सिबा दास, डॉ. निलेश तरवाळ यांच्यासह जवळपास २०० विद्यार्थी, नागरिक उपस्थित होते. विवेकानंद कॉलेजमधील पदार्थविज्ञानशास्त्र विभाग आणि खगोलशास्त्र विभागाच्या वतीनेही कॉलेजवर चांद्रयान तीनचे चंद्रावरील थेट प्रक्षेपण विद्यार्थ्यांना दाखवण्यात आले.



**कोल्हापूर : 'चांद्रयान ३' चंद्रावर लँडींग होत असल्याचे प्रक्षेपण पाहताना शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थीनी.**

लोकमत

# शिवाजी विद्यापीठातून थेट प्रक्षेपण

१ शिवाजी विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृह येथे उपस्थितांना चंद्राच्या पृष्ठभागावर चंद्रयानच्या लँडिंगचे थेट प्रक्षेपण दाखविण्यात आले.

२ त्याचबरोबर, विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान अधिविभाग सभागृह आणि पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्र येथेही प्रक्षेपण पाहण्याची सुविधा करण्यात आली.

३ चंद्रयानच्या लँडिंगनंतर विद्यार्थ्यांच्या उपस्थितीने भरलेले संपूर्ण सभागृह भारत मातेच्या जयघोषाने दणाणून गेले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यावेळी उपस्थित होते.

चंद्रावर यान उतरवून आपण आता मानवही चंद्रावर पाठवू शकतो, इतर ग्रहावरही जाऊ शकतो, ही क्षमता सिद्ध केली आहे. चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर कोणती खनिजे, मूलद्रव्ये आहेत, याची माहिती मिळू शकणार आहे.

- डॉ. राजीव व्हटकर, समन्वयक, अवकाश संशोधन केंद्र पन्हाळा, शिवाजी विद्यापीठ.

चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरणारा भारत पहिला देश आहे. हे यान तेथे पाणी, खनिजे यांचा शोध घेईल, शिवाय चंद्र-पृथ्वी यांचे अंतर किती आहे, हेही यामुळे समजणार आहे.

- डॉ. संजय पाठारे, विभागप्रमुख भूगर्भशास्त्र, राजाराम कॉलेज, कोल्हापूर

नील आर्मस्ट्राँग १९६७ मध्ये चंद्रावर उतरले, ते आम्ही रेडिओवरून बातमी रूपाने ऐकले, पण ५६ वर्षांनी आपले चंद्रयान चंद्रावर उतरलेले हे घरी टीव्हीवर पाहिले. धन्य झालो. अभिमान आहे भारतीय असल्याचा.

- प्रभाकर तांबट, नागरिक, कोल्हापूर.


पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात मोहिमेचे थेट प्रक्षेपण

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश केंद्रातर्फे पदार्थ विज्ञान अधिविभाग, तसेच पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्रावर चांद्रयान ३ मोहिमेचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. यापूर्वी जगभरात झालेल्या मोहिमा, तसेच 'चांद्रयान ३' या मोहिमेची माहिती अवकाश संशोधन केंद्राचे संचालक डॉ. राजीव व्हटकर यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठातर्फे विद्यार्थ्यांना खगोलीय घटनांविषयी शास्त्रीय माहिती व्हावी, यासाठी विविध उपक्रम राबवले जातात. प्रत्येक घटनेवेळी विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्रातर्फे उपक्रम राबवून त्या घटनेची तांत्रिक माहिती दिली जाते. ऐतिहासिक चांद्रयान ३ मोहिमेच्या निमित्ताने शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थ विज्ञान विभागामध्ये, तसेच पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्रात मोहिमेचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. सायंकाळी ५ वाजल्यापासूनच विद्यार्थी व खगोलप्रेमींनी गर्दी केली होती, तसेच पन्हाळा येथे दुर्बिणीतून चंद्र पाहण्याची सोय करण्यात आली होती. यावेळी विद्यार्थ्यांनी या मोहिमेविषयी विविध प्रश्न उपस्थित केले. त्यांचे निरसन डॉ. व्हटकर यांनी यावेळी केले.



पुढारी

# शिवाजी विद्यापीठातर्फे स्टार्टअप स्पर्धेचे आयोजन

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

उदयोन्मुख उद्योजकांना अधिकाधिक प्रोत्साहित करून स्टार्टअप्सना नवरोजगारांना संधी देण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूशन इनोव्हेशन कौन्सिलतर्फे इंटर-इन्स्टिट्यूशनल स्टार्टअप स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

भारत सरकारच्या स्टार्टअप इंडिया माध्यमातून नोंदणीकृत असलेले स्टार्टअप या स्पर्धेकरिता भाग घेण्यास पात्र आहेत. टेक्नॉलॉजी व आयटी, हेल्थकेअर व बायोटेक्नॉलॉजी, सोशल इम्पॅक्ट, एन्व्हायर्न्मेंट व सस्टेनेबिलिटी, शिक्षण व एज्युटेक, शेती व शेती तंत्रज्ञान, कन्झ्युमर प्रॉडक्टस् आणि सर्व्हिसेस अशा विविध क्षेत्रांमधील स्टार्टअप्सना या स्पर्धेमध्ये भाग घेता येईल.

सदर स्पर्धेत भाग घेण्याकरिता शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर माहितीपत्रक उपलब्ध असून ऑनलाईन रजिस्ट्रेशनच्या माध्यमातून आपल्या नोंदणीकृत स्टार्टअपची अधिकृत माहिती भरून यात सहभागी होता येईल. विजेत्यांना रोख पारितोषिक तसेच प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. सहभागी होण्याकरिता रजिस्ट्रेशनची अंतिम तारीख दि. २६ ऑगस्ट असून, स्टार्टअपचे परीक्षण व मूल्यांकन दि. २९ ऑगस्ट रोजी शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात आयोजित करण्यात आले आहे.

स्टार्टअपकरिता आयोजित स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक प्रा. एस. एन. सपली यांनी केले आहे.

सकाळ

# शिवाजी विद्यापीठातर्फे स्टार्टअप स्पर्धा

कोल्हापूर : उदयोन्मुख उद्योजकांना अधिकाधिक प्रोत्साहित करून स्टार्टअप्सना नवरोजगाराच्या संधी निर्माण करण्याच्या उद्देशाने शिवाजी विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूशन इनोव्हेशन कौन्सिलतर्फे इंटर-इन्स्टिट्यूशनल स्टार्टअप स्पर्धा आयोजित केली आहे. केंद्र सरकारच्या स्टार्टअप इंडिया माध्यमातून नोंदणीकृत असलेले स्टार्टअप या स्पर्धेकरिता भाग घेण्यास पात्र आहेत. टेक्नॉलॉजी व आयटी, हेल्थकेअर व बायोटेक्नॉलॉजी, सोशल इम्पॅक्ट, एन्व्हायरमेंट व सस्टेनेबिलिटी, शिक्षण व एज्युटेक, शेती व शेती तंत्रज्ञान, कंज्युमर प्रॉडक्ट्स आणि सर्व्हिसेस अशा विविध क्षेत्रांमधील स्टार्टअप्सना या स्पर्धेमध्ये भाग घेता येईल.या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी नोंदणी करण्याची अंतिम तारीख २६ ऑगस्ट आहे. स्टार्टअपचे परीक्षण व मूल्यांकन २९ ऑगस्टला तंत्रज्ञान अधिविभागात होईल. स्टार्टअपकरिता आयोजित केलेल्या या स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक प्रा. डॉ. एस. एन. सपली यांनी केले आहे.

सकाळ

# विद्यापीठात मंगळवारी मॅरेथॉन

कोल्हापूर : विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) सूचनेनुसार शिवाजी विद्यापीठात 'जी-२० युनिर्व्हिसिटी कनेक्ट प्रोग्रॅम' राबविण्यात येणार आहे. याअंतर्गत आणि राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त मंगळवारी (ता. २९) सकाळी ७ ला विद्यापीठात मॅरेथॉन होणार आहे. मुख्य इमारतीपासून सुरवात होईल. त्यात शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी सहभागी होतील.

सकाळ

# 'बी. फार्मसी'चा निकाल जाहीर

कोल्हापूर : बी.फार्मसी (सत्र पाच आणि सहा) या अभ्यासक्रमांच्या परीक्षांचा निकाल शिवाजी विद्यापीठाने बुधवारी जाहीर केला. बी. व्होक नर्सिंग, कॉम्प्युटर प्रोग्रॅमिंग, न्यूट्रिशन, केन अॅग्रीकल्चर अँड शुगर टेक्नॉलॉजी आदी विविध ८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. त्यासाठी एकूण ६९ विद्यार्थी उपस्थित होते.

तरुण भारत

# स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या मुलाखती आज

- विद्यापीठातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे प्रवेश निश्चित होणार

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या प्रवेशासाठी लेखी परीक्षा घेण्यात आली. लेखी परीक्षेतील पात्र उमेदवारांच्या आजपासून मुलाखती घेतल्या जाणार आहेत. २५ ऑगस्टला मुलाखती संपल्यानंतर गुणवत्तेनुसार प्रवेश दिले जाणार आहेत. तरी पात्र उमेदवारांनी मुलाखतीला उपस्थित राहावे, असे आवाहन केंद्राचे समन्वयक डॉ. पी. एस. कांबळे यांनी केले आहे.

मुलाखतीला येताना सर्व प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी पदवीच्या शेवटच्या वर्षाचे गुणपत्रक किंवा पदवीप्रमाणपत्र आवश्यक आहे. अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी जातीच्या दाखल्याची मूळ प्रत आणावी. ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी जातप्रमाणपत्र व नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र, ईडब्ल्यूएस दाखला, खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी शेवटच्या वर्षाचे प्रमाणपत्र, मायनॉरिटी कम्युनिटी, अल्पसंख्यांक प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला घेऊन येणे आवश्यक आहे.